लोकमत

# पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश, नियम, २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि दिनांक २३/०६/२०२२ च्या सेवाप्रवेशात नियमात केलेल्या सुधारिततरतुदीनुसार पोलीस अधीक्षककार्यालय, अहमदनगर यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची २५ रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीव्दारे दिनांक ०५/०३/२०२४ ते ३१/०३/२०२४ या कालावधीत स्विकारण्यात येतील ह्या बाबत सविस्तर माहीती policerecruitment2024.mahait.org आणि www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहीतीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

●उमेदवारास पोलीस अधीक्षक, अहमदनगर यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई या पदांसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादरकरता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादरकरण्याची सुविधा policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे. ●उमेदवार एका पदाकरीतासंपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्तएका घटकात अर्ज करु शकतो. ●उमेदवाराने चुकीची माहीती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्दहोईल. ●पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची प्रथम ५० गुणाची शारीरीक चाचणीपरिक्षाघेण्यात येईल. व त्यानंतरहोणारी लेखी परिक्षाही सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परिक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरचीबाब विचारात घेऊन आवेदन अर्ज भरावा. ●भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारीरीक चाचणी घेण्यात येणार आहे. शारिरीक योग्यता चाचणीमध्ये किमान ५०% गुण मिळविणारे उमेदवारांमधून संबंधीत प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्तपदाच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परिक्षेमध्ये किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परिक्षेमध्ये ४०% पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील. ●सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परिक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरचीबाब विचारात घेऊनच आवेदन अर्ज भरावा. ● शारीरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमुद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांमधून एक गुणवत्ता यादी तयार केली जाईल. तात्पुरत्या निवड सुचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसुचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसुचीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (provisional selection) असेल. शारीरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरणकेल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दिनांक १०/१२/२०२० नुसार अंतीम गुणवत्तायादी तयारकरण्यांत येईल. ●पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारीरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती, परिक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादरकरण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सुचना policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. सदरहु जाहिरात उमेदवारांनी काळजीपूर्वक वाचून, समजून घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथांकरीता उपलब्ध पदांच्या १% आरक्षीत जागा विचारात घेऊन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पदध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत. ●भरती प्रक्रिये दरम्यान शारीरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास, त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्येकोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही. ●उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे. त्या घटकात रिक्त असलेले पदे विचारात घेऊनच उमेदवारांनी अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात. परंतुखुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाही. ●पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिकाक्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतीम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहीत याचीकाक्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७/०६/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहीती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकारी आहे.

सही

(राकेश ओला)

पोलीस अधीक्षक, अहमदनगर